दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
वादळ वार्ता
VADAL VARTA
vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७
● बीड/महाराष्ट्र ● बुधवार १२ जून २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक ३०४ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# चित्रपटानंतर आता मनोज जरांगे पाटील यांच्या नावाने शाळा, जय जगदंब शिक्षण संस्थेचे मुंगशी विद्यालयाला जरांगे पाटील यांचं नाव



मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्यावर चित्रपट येत आहे. संघर्ष योद्धा मनोज जरंगे पाटील आणि मर्द मावळा शिवरायांचा वाघ हे चित्रपट याच महिन्यात प्रदर्शित होत आहे. त्यामध्ये मनोज जरांगे पाटील यांची संघर्षकथा मांडण्यात आली आहे. आता मनोज जरांगे यांचे नाव शाळांनाही देण्यात येणार आहे. सोलापूर जिल्ह्यातील शाळेला मनोज जरांगे पाटील यांच नाव देण्याचा ठराव मंजूर झाला आहे. बार्शी तालुक्यातील जय जगदंब शिक्षण संस्थेने मुंगशी विद्यालयाला जरांगे पाटील यांचं नाव देण्याचा ठराव करण्यात आला.

मनोज जरांगे पाटील यांना दिले पत्र

जय जगदंब शिक्षण संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी अंतरवली सराटी येथे जाऊन मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. त्यानंतर तुमचे नाव शाळेला देण्याची अनुमती मिळावी यासाठी पत्र दिले आहे. तसेच जरांगे पाटील यांना नामांकरण सोहळ्याचे सुद्धा निमंत्रण संस्थेनेकडून देण्यात आले आहे. याबाबत मनोज जरंगे पाटील यांच्याकडून शिक्षण संस्थेला सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे

मनोज जरांगे उपस्थित राहणार

मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील हे स्वतः या नामकरण सोहळ्याला उपस्थित असणार असल्याचे शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉक्टर कपिल कोरके सांगितला आहे. त्यामुळे मनोज जरांगे पाटील यांच शाळेला नाव देण्याचा पहिला मान सोलापूर जिल्ह्याला भेटला आहे.बार्शी तालुक्यातील मुंगशी या गावामध्ये 1998 साली या विद्यालयाची स्थापना करण्यात आली होती.

## मनोज जरांगे यांनी घेतले औषधोपचार

पाटील यांनी अखेर उपोषणाचा बुधवारी पाचवा दिवस आहे. त्यापूर्वी चौथ्या दिवशी त्यांची प्रकृती खालवली होती. त्यामुळे त्यांनी औषधोपचार घ्यावे, यासाठी दोन वेळा डॉक्टरांचे पथक केले. परंतु त्यांनी औषध उपचार घेण्यास स्पष्ट नकार दिला. अखेर बुधवारी मध्यरात्री त्यांनी औषध उपचार घेतले. जरांगे पाटील यांनी सगळ्या सोयऱ्याची अंमलबजावणी करून कायद्यात रूपांतर करण्यासाठी उपोषण सुरु केले आहे. चार दिवस त्यांनी अन्न पाणी आणि औषधोपचार घेतला नव्हता. परंतु काल रात्री यांच्यावर वैद्यकीय पथकाच्या माध्यमातून औषध उपचाराला सुरुवात करण्यात आली. सलग उपोषण केल्यामुळे जरांगे पाटील यांची तब्येत खालावत असल्याने त्यांना औषध उपचाराची गरज होती.

## कृषी कन्यांनी शेतकऱ्यांना दिली बिजांकुरण प्रात्याक्षिकाची माहिती

**प्रतिनिधी/नवगण राजुरी**

सौ.के.एस.के.(काकू)कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी बिजांकडून या विषयावर प्रात्याक्षीकाद्वारे शेतकऱ्यांना माहिती दिली. योग्य नियोजना अभावी दरवर्षी शेतकऱ्यांना बियाणे न उगवल्यामुळे दुबार पेरणीची वेळ येते त्यामुळे या प्रात्यक्षिकामुळे बियाण्याची उगवण्याची क्षमता पेरणीपूर्वीच चाचणी करून घेणे गरजेचे आहे. विद्यार्थिनींनी शेतकऱ्यांना बिजांकुरण प्रदर्शनाबद्दल सविस्तर माहिती दिली. सोयाबीन या पिकाचे प्रात्यक्षिक करून दाखविले.



यावेळी कृषी कन्या खोड प्रतीक्षा, गवळी संध्या, पवार ज्योती, करांडे रूपाली, पाटील यशस्वी, खोले निकिता उपस्थित होत्या. ग्रामीण जागरूकता कार्यक्रम कार्यानुभव कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी अनंत कृषी विकास प्रतिष्ठानचे सहसचिव डॉ.जी.व्ही. साळुंखे यांचे मार्गदर्शन लाभत आहे तसेच प्राचार्य एस.पी. मोरे, प्रा.व्ही.जी. तायडे, एस.एस. राठोड, पी.ए. गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

# खा. बजरंग सोनवणेकडून जनसामान्यांच्या अडचणी जाणून घेत प्रत्यक्ष कामाला सुरुवात

## पवनसुत निवासस्थानी नागरिकांनी केली गर्दी

**प्रतिनिधी/केज :-**

आठवडाभरानंतर खासदार बजरंग सोनवणे हे जिल्ह्यात दाखल होताच त्यांच्या केज येथील पवनसुत नागरिकांनी प्रचंड गर्दी केली. तर त्यांनी नागरिकांच्या अडचणी जाणून घेत प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली आहे. त्यामुळे प्रचारात त्यांनी एक खासदार काय असतो ? हे दाखवून देऊ अशी ग्वाही दिली. त्याची प्रचिती यावरून दिसून येत आहे.



बीड जिल्ह्याचा खासदार म्हणून निवडून आल्यानंतर बजरंग सोनवणे यांनी दुसऱ्या दिवशी पक्षाचे अध्यक्ष जाणते राजे खा. शरदचंद्र पवार यांची भेट घेतली. त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी ते मुंबई येथे गेले होते. त्यानंतर ते वरिष्ठांच्या आदेशानुसार मुंबई येथेच होते. सोमवारी पक्षाच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने अहिल्यानगर येथे आयोजित कार्यक्रमाला त्यांची मुख्य उपस्थिती होती. यावेळी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आपला फेटा बजरंग सोनवणे यांना घालत जायंट किलर असा उल्लेखही केला. तर बजरंग सोनवणे यांनी आपल्या भाषणात आपण आगामी विधानसभेसाठी मराठवाड्यात मोठी मोर्चेबांधणी करू व यश मिळवून देऊ असा विश्वास व्यक्त केला

आठवडाभरानंतर खा. बजरंग सोनवणे हे केजमध्ये पोहचले. मंगळवारी सकाळपासूनच त्यांच्या पवनसुत या निवासस्थानी नागरिकांची प्रचंड गर्दी जमली होती. ऍक्शन मोडवर असलेल्या सोनवणेंनी आलेल्या नागरिकांनी अडचणी ऐकून घेत त्या सोडवण्यासाठी अनेक अधिकारी वर्गांना फोन करीत त्या समस्या सोडवण्याच्या सूचनाही केल्या. आपली अडचण समजून घेत प्रशासकीय अधिकाऱ्यांशी बाप्पानी संपर्क केल्यामुळे नागरिकांच्या चेहऱ्यावर समाधान दिसत होते.

# वृक्षारोपण व ग्रंथ वाटून वाढदिवस साजरा....

**बीड/प्रतिनिधी**

डाक विभागाचे असिस्टंट पोस्ट मास्तर अमरसिंग ढाका व जि. प.माध्यमीक चे उपशिक्षणाधिकारी नानाभाऊ हजारे यांचा संयुक्त जन्मदिवस 9 जुन रोजी रविवार होता व पोस्ट ऑफिस व जि.प. शिक्षण विभागात राजेश खटावकर अधीक्षक वेतन व भविष्य निर्वाह निधी व अजय बहीर



अधीक्षक शिक्षण विभाग यांच्या हस्ते वृक्षारोपण व बाबासाहेब आंबेडकर लिखित जाती संस्थेचे उच्चाटन ॲनिहिलेशन ऑफ कास्ट व "देवळाचा धर्म आणि धर्मातली देवळे" प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे लिखीत हे दोन ग्रंथ वाटून साजरा करण्यात आला. त्यावेळी सोबत सामाजिक कार्यकर्ते मुसाखान, मिलिया स्कूल से प्राचार्य इरफ़ान सिद्दीकी व डाक विभागाचे पोस्ट मास्तर हेमंत वानखेडे,उप पोस्ट मास्तर विष्णू वीर अकाउंटंट बाबुराव धनवडे, अरूण पतंगे,बाबासाहेब जाधव, दत्तात्रेय गाडेकर, बाबासाहेब मोरे, किरण सावंत, अब्दुल जुनेद, तांबडे,उमेश शिंदे, उमेश बागलाणे, महादेव रसाळ,मनोहर भालशंकर इत्यादी कर्मचारी हजर होते.

## प्रभाग क्र. २४ मध्ये खराब रस्ते, तुंबलेल्या नाल्याची साफसफाई, दुरुस्ती करा -शुभम जोगदंड न.प.मुख्याधिकारी निता अंधारे यांना निवेदन

प्रभाग क्रमांक २४ मधील लोकांच्या समस्या पाहता रस्ते खराब व नाल्यातून दिला आहे त्यामुळे रहदारी करताना प्रभागातील लोकांना अडचण होत आहे काही लोकांची अपघात ही घडलेले पहावयास मिळत आहे. काही लोकांचे अपघातही या रस्त्यावर झालेले आहेत. या संदर्भात बीड नगर परिषदेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे निवेदन देऊन कामा तात्काळ करावे व दुरुस्ती करावी अशी मागणी करण्यात आली आहे. कामाचा आढावा घेण्यात आला



यावेळी राष्ट्रवादी विध्यार्थी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सरचिटणीस शुभम जोगदंड, जिल्हा सचिव अमित डोंगरे,जिल्हा सरचिटणीस अलंकार सरवदे व आदी उपस्थित होते.

# सहा वर्षापासून अनुकंपा तत्वावर नोकरीस घेतले नाही सुनिता गित्ते व कुटुंबाचे दुसऱ्या दिवशी आमरण उपोषण सुरु

## उपोषणकर्त्या सुनिता गित्ते यांना गंभीर आजार तरी देखील समाज कल्याण प्रशासनाचे दुर्लक्ष

**बीड/प्रतिनिधी**

साने गुरुजी निवासी विद्यालय केज ता. जिल्हा बीड येथे कै. गोविंद ज्ञानोबा गीते ते सहशिक्षक पदावर कार्यरत होते, त्यांच्या निधनानंतर अनुकंपातत्वावर त्यांचा मुलगा श्रीनाथ गोविंद गीते यास नियमानुसार नोकरी मिळावी म्हणून सर्व कागदपत्रांची पुर्तता करुन व वारंवार 'पाठपुरावा करुनही आजतागायत नौकरी मिळत नसल्याने व मोठ्या आजाराने मुळे गित्ते कुंटूबावर उपासमारीची वेळ आली आहे. सुनिता गोविंद गीते व कुंटूंबावर होत. होत असलेला अन्याय दुर व्हावा म्हणून वारंवार समाज कल्याण कार्यालयास व वरिष्ट कार्यालयास पत्र व्यवहार केला आहे. परंतु पत्रव्यवहाराची कोणतीही दखल न घेता सतत प्रस्तावात त्रुटी काढून नौकरी दिली जात नाही. मात्र इतरांच्या नियुक्त त्यांनी पैसे घेऊन केले आहे. व गीते कुटुंबीयांची आर्थिक परिस्थिती नाजूक आहे. त्यामुळे मी दिनांक 27/05/2024 रोजी उपोषण करण्याची नोटीस दिली होती. तरी अद्यापपर्यंत बीड अनुकंप तत्वावरील नौकरीची ऑर्डर दिली नाही. त्यामुळे नाईलाजास्तव होत असलेल्या अन्याया विरुध्द दिनांक 10/06/2024 रोजी पासुन




समाज कल्याण कार्यालयासमोर सहकुंटूंब आमरण उपोषणास बसले आहे. गीते कुटुंबीय उपोषणा करण्यापासून बीड समाज कल्याण विभागातील अधिकारी कर्मचारी दबाव आणण्याचा प्रयत्न करत आहेत. या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून नियमबाह्य भरलेल्या जागेची तपासणी करण्यात यावी यामध्ये मोठा आर्थिक व्यवहार झाल्याचेही उपोषणकर्त्यांचा आरोप आहे.

उपोषणाचा आज दुसरा दिवस आहे व अद्यापही समाज कल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांनी या उपोषणकर्त्यांची दखल घेतली नाही. उपोषणकर्ते या गंभीर आजारात असल्यामुळे त्यांच्या जीवाचं काय बर वाईट झालं तर याची परिणाम समाज कल्याण विभागातील अधिकाऱ्यांना भोगावे लागतील कुपोषणाचा आज दुसरा दिवस सुरू आहे.

कविता

## पाऊस

ढग अंधारून आले
काळा घन बरसला
वारा वेगाने धावतो
थेंब टपोरा धावला

गारा आल्या सरसरा
ढेकळात विखुरल्या
तापलेल्या ढेखळात
कशा वितळून गेल्या

हिरव्यागार रानामध्ये
मयुर नृत्य मोहक
नृत्य करीते बिजली
ढग वाजवी ढोलकं

चिऊताई खोप्यामध्ये
बाळास देई ऊब
आईच्या मऊ स्पर्शात
तिचं सारं घर उभं

सरीवरी येती सरी
डबक्याचे झाले तळे
बेडकाचे डरावणे
एकवटूनिया बळे

स्वप्न डोळ्यात पाहतो
सुखावला बळीराजा
कृपा कर पांडुरंगा
बाप माझा भक्त तुझा

शीला पाटील. चांदवड.

# स्थानिक स्वराज्य शाळेतील विद्यार्थी मोफत गणवेश पासुन वंचित शाळेच्या पहील्या दिवशी गणवेश देण्याचे नियोजन धासळले

**दैनिक वादळ वार्ता**
**छ.संभाजीनगर/प्रा संजय तुपे**

• समग्र शिक्षा अंतर्गत २०२४-२५ मोफत गणवेश योजनेचे शाळा निहाय विद्यार्थ्यांच्या गणवेश शिलाईसाठी अद्यापपर्यंत मापे न घेतलीच नाही.
• स्काऊट व गाईड विषयास अनुसरून गणवेश वितरणाच्या संबंधाने शालेय स्तरावर मान्य अनुदानातून गणवेश शिलाईस येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन आवश्यक कार्यवाही करावी.
• शिलाईचे दर वाढविण्याची प्राथमिक शिक्षक समितीची मागणी

प्रतिनिधी दि.११- समग्र शिक्षा अभियान अंतर्गत जिल्हा परिषद, नगर पालिका, महानगर पालिकांच्या शाळांत इयत्ता १ ली ते ८ वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना दरवर्षी गणवेशाचे दोन संच पुरविण्यासाठी प्रती गणवेश ३०० रुपयांप्रमाणे अनुदान शाळा व्यवस्थापन समितीकडे उपलब्ध करून दिले जात होते. त्यानुसार दरवर्षी नवीन सत्रात शाळा सुरु होण्याच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना गणवेश वितरित केले जायचे. सदर योजनेचे कार्यान्वयन व्यवस्थित सुरु असताना यावर्षी शासनाने गणवेश योजनेच्या कार्यान्वयनात विनाकारण बदल केला अशी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती म्हणून ठाम धारणा आहे. २०२४-२५ च्या शैक्षणिक सत्रात जिल्हा परिषद,नगर पालिका, महानगर पालिकांच्या प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांना नियमित गणवेशाचा एक संच आणि स्काऊट गाईड गणवेशाचा एक संच पुरविण्याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गत करण्यात आलेल्या आहेत.गणवेश कापडाचे मायक्रो कटिंग करून आवश्यक संख्येने पुरवठा करण्याचे कंत्राट मे.पदमचंद मिलापचंद जैन यांना ४ मार्च २०२४ रोजी देण्यात आले आहे. संबंधित पुरवठादाराने कापड बॉक्स प्रत्येक गट शिक्षणाधिकारी यांना पुरवायचे आहे.त्यांनतर लोक संचालित साधन केंद्रांतर्गत स्थानिक स्तरावरील महिला बचत गटाद्वारे गणवेशाची शिलाई करून त्यांच्याकडून शाळांपर्यंत शिवलेल्या गणवेशाचा पुरवठा करायचा आहे. त्या प्रमाणे महिला आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत महिला बचत गटाच्या कारागिरांनी शाळेस भेट देऊन संबंधित इयत्तेतील प्रत्येक विद्यार्थी/ विद्यार्थिनींची मापे घेऊन स्टँडर्ड मापांनुसार गणवेश शिलाई करून शाळा स्तरावर पोहोचते करून द्यायचे आहे.पण आज पर्यंत ही कार्यवाही झाली नाही.ती कार्यवाही करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे,राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी राज्य प्रकल्प संचालक मुंबई यांच्या कडे निवेदना व्दारे केली आहे असल्याचे शिक्षक समितीचे मराठवाडा विभागीय प्रसिध्दी प्रमुख सतिष कोळी यांनी सांगीतले आहे. विदर्भ वगळता उर्वरित महाराष्ट्रातील शाळा शनिवारी दि.१५ जून २०२४ रोजी सुरु होत असूनही (शाळा सुरु होण्यास अवघे ५-६ दिवस राहिले असताना) व विदर्भातील शाळा १ जुलै २०२४ पासून सुरु होत असताना अद्यापपर्यंत राज्यातील कोणत्याही जिल्ह्यातील एकाही शाळेत जाऊन शिलाईचे काम करणाऱ्या संस्थेच्या कारागिरांनी आज १० जून २०२४ पर्यंत लाभार्थी विद्यार्थ्यांची मापे घेतलेली नाहीत. अशा परिस्थितीत शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना योग्य मापाचे नियमित गणवेश कसे मिळतील..? तसेच अंदाजे मापे गृहीत धरून गणवेश शिलाई केल्यामुळे विद्यार्थ्यांना योग्य मापाचा गणवेश न मिळाल्यास पालकांच्या रोषाला स्थानिक शिक्षकांना सामोरे जावे लागणार आहे. शासनच्या पत्रानुसार नियमित गणवेशासह स्काऊट गाईड चा गणवेश सुद्धा संबंधित महिला बचत गटाकडून शिलाई करून दिल्या जाणार असल्याचे नमूद आहे. परंतु पत्रा नुसार आता शाळांना स्काऊट-गाईंड च्या गणवेशाचे कापड पुरविले जाणार आहे. पत्रा नुसार त्यासाठी प्रती गणवेश शिलाईसाठी १०० रुपये व अनुषंगिक खर्चासाठी प्रती गणवेश १० रुपये अनुदान दिले जाणार आहे. नियमित गणवेश शिलाईसाठी महिला बचत गटांना एकत्रित मोठ्या संख्येने काम मिळाल्याने त्यांनी १०० रुपयात गणवेश शिलाईचे दर मान्य केले. परंतु अगदी कमी संख्येने शाळेतील विद्यार्थी असल्याने अनेक शाळेत १५-२० किंवा त्यापेक्षा कमी/अधिक संख्येने विद्यार्थी असल्यास केवळ १०० रुपयात हाफ पॅन्ट, शर्ट, फुल पॅन्ट-शर्ट, सलवार-कमीज, स्कर्टची शिलाई कोणीही करून देणे शक्य नाही.अत्यंत कमी संख्या असल्याने रुपये १०० इतक्या कमी पैशात कुठेही शिलाई करून मिळणे वास्तवात अशक्य आहे.त्यामुळे स्काऊट गाईड चा गणवेश शिवून देण्याची जबाबदारी शाळा व्यवस्थापन समिती अर्थात कार्यान्वयन करणाऱ्या मुख्याध्यापकाकडे देण्यात येऊ नये अशी विनंती शिक्षक समितीने केली आहे. गणवेश योजनेच्या संबंधाने कार्यान्वयनात येणाऱ्या अडचणी समजून घेऊन आवश्यक कार्यवाही करण्यासह सर्व विद्यार्थ्यांना योग्य मापाचे गणवेश शाळेच्या पहिल्या दिवशी १५ जून २०२४ आणि विदर्भात १ जुलै २०२४ पूर्वी वितरित होण्याची कार्यवाही करावी.तसेच स्काऊट गाईड चे गणवेश सुद्धा नियमित गणवेशाप्रमाणे शिलाई करूनच शाळांना मिळावेत अशी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे विजय कोंबे,राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर, शिक्षक नेते उदय शिंदे, राज्य सल्लागार विजयकुमार पंडित, महादेव पाटील माळवदकर,राज्य उपाध्यक्ष राजन सावंत,आनंदा कांदळकर,विलास कंटेकुरे,राज्य कार्याध्यक्ष सयाजी पाटील,राज्य कोषाध्यक्ष नंदकुमार होळकर,राज्य संघटक राजेंद्र खेडकर,सुरेश पाटील,राज्य कार्यालयीन चिटणीस किशोर पाटील, सतिश सांगळे,राज्य संपर्क प्रमुख किशन बिरादार,राज्य प्रवक्ता नितीन नवले,राज्य प्रसिद्धी प्रमुख राजेश सावरकर,राज्य ऑडिटर पंडित नागरगोजे,महिला आघाडी प्रमुख वर्षाताई केनवडे,नपा-मनपा आघाडी प्रमुख सुधाकर सावंत,जुनी पेन्शन आघाडी प्रमुख प्रफुल्ल पुंडकर,ऊर्दू आघाडी प्रमुख सैय्यद शफीक, वस्ती शाळा आघाडी प्रमुख विजय आण्णा खडके,मराठवाडा विभागीय अध्यक्ष शाम राजपूत,विभागीय सचिव शिवाजी कवाळे, जिल्हाध्यक्ष विजय साळकर(छत्रपती संभाजी नगर), अरुण सोळंके(लातूर), महेश सातपुते(बीड), श्रीराम महाजन(हिंगोली),रमेश बारस्कर(धाराशिव), तसलीम शेख(नांदेड), प्रभाकर शिरसाट(परभणी), दिनेश एखंडे(जालना), सुरेंद्र गोल्हार,विकास पूरी,शिवाजी अन्नमवार, राहूल उंडाळे यांनी केली असल्याचे शिक्षक समिती मराठवाडा विभागाचे प्रसिध्दी प्रमुख सतिष कोळी यांनी कळविले आहे.
•

• समग्र शिक्षा अंतर्गत २०२४-२५ मोफत गणवेश योजनेचे शाळा निहाय विद्यार्थ्यांच्या गणवेश शिलाईसाठी अद्यापपर्यंत मापे न घेतलीच नाही.
• स्काऊट व गाईड विषयास अनुसरून गणवेश वितरणाच्या संबंधाने शालेय स्तरावर मान्य अनुदानातून गणवेश शिलाईस येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन आवश्यक कार्यवाही करावी.
• शिलाईचे दर वाढविण्याची प्राथमिक शिक्षक समितीची मागणी विजय साळकर (जिल्हा अध्यक्ष) महा. राज्य प्राथमिक शिक्षक समिती छत्रपती संभाजीनगर

१०० रुपयात हाफ पॅन्ट, शर्ट, फुल पॅन्ट-शर्ट, सलवार-कमीज, स्कर्टची शिलाई कोणीही करून देणे शक्य नाही.बहुतांश शाळेत अत्यंत कमी पटसंख्या असल्याने रुपये १०० इतक्या कमी पैशात कुठेही शिलाई करून मिळणे वास्तवात अशक्य आहे.त्यामुळे स्काऊट गाईड चा गणवेश शिवून देण्याची जबाबदारी शाळा व्यवस्थापन समिती अर्थात कार्यान्वयन करणाऱ्या मुख्याध्यापकाकडे देण्यात येऊ नये.

सतिष कोळी

मराठवाडा विभागीय प्रसिध्दी प्रमुख शिक्षक समिती

# बीडच्या मुलांनी राज्यस्तरीय रग्बी स्पर्धेत मिळवले रौप्य पदक

**वादळवार्ता/बीड**




महाराष्ट्र रग्बी असोसिएशन यांच्या मान्यतेने आणि पुणे रग्बी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने ११ वी राज्यस्तरीय रग्बी स्पर्धा दिनांक ८ ते ९ जून दरम्यान श्री शिछत्रपती क्रिडापीठ महळुंगे - बालेवाडी पुणे येथे संपन्न झाली. महाराष्ट्रभरातून २१ संघ या स्पर्धेत सहभागी झाले होते. बीड जिल्हाचा १७ वर्षाखालील वयोगटात मुलांचा व मुलींचा संघ या स्पर्धेत संघ सहभागी झाले होते. या पैकी मुलांच्या संघाने
पहिला सामना, सांगली ०० गुण विरुद्ध बीड २२ गुण असा जिंकला , नांदेड ०० गुण विरुद्ध बीड ४८ गुण दुसरा सामना असा जिंकला, उप उपांत्य रत्नागिरी संघ ०७ गुण विरुद्ध बीड संघ २७ गुण, उपांत्य फेरीत बलाढ्य असा ठाणे संघाबरोबर ०५-२७ गुण असा सामना एकतर्फी जिंकून बीड संघाने अंतिम फेरीत दिमाखात प्रवेश केला. सुवर्ण पडकासाठी अंतिम सामना पारंपरिक कोल्हापूर सारख्या बलाढ्य संघाबरोबर झाला. यामध्ये शेवटच्या क्षणापर्यंत बीड संघाने अत्यंत उत्कृष्ट खेळ करत,बरोबर चुरशीची लढत दिली,परंतु या सामन्यात निसटता पराभव झाल्यामुळे बीड संघाला रौप्य पदकावरती समाधान मानावे लागले. या स्पर्धेसाठी १७ वर्ष मुले संघ पुढील प्रमाणे संदीप राजेश वाडमारे (कर्णधार),वेदांत गोरख डावकर, ऋषभ बापू शिंदे, आदित्य ऋषिकांत तांदळे, प्रतीक प्रल्हाद शिंगटे ,सार्थक कुमार पवार, सुमित रघुनाथ मुंडे,यश रवींद्र सूर्यवंशी, पवन सोमिनाथ मस्कर, सार्थक बाबू भुसारी, मनोज दत्तात्रय चौधरी, ओमकार महादेव येळवे, खांडे आकाश भास्कर या खेळाडूंचा समावेश होता.या संघास रग्बी असोसिएशन ऑफ महाराष्ट्र चे नासेर शेख, मिनाल पास्तला, कु.वाहाबिज भरोचा, विश्वास कोटकरी यांच्या प्रमुख उपस्थितीत श्री नितीन येळवे यांच्या हस्ते रौप्य पदक देऊन सन्मानित करण्यात आले.

या संघाचे मुख्य प्रशिक्षक म्हणून श्री नितीन येळवे, व्यवस्थापक श्री शोयब खाटीक श्री अशोक चौरे यांनी उत्कृष्ठ कामगिरी पार पडली आहे. राज्य स्पर्धेसाठी बीड जिल्ह्यातील संभाजी गिरे आणि विशाल ढास यांनी प्रथमच पंच/तांत्रिक अधिकारी म्हणून उत्तम कामगिरी पार पडली आहे.विजयी संघाचे अभिनंदन बीड जिल्हा रग्बी असोसिएशन अध्यक्ष इसाक शेख , कोषाध्यक्ष हरिभाऊ बांगर , उपाध्यक्ष रमेश सानप, सचिव महेश घुले, कार्याध्यक्ष नितीन येळवे , क्रीडा अधिकारी पंडित चव्हाण साहेब, योगेश करांडे, जितू अराक सर, आंतरराष्ट्रीय खेळाडू यश जाधव ,राष्ट्रीय खेळाडू सुरज येवले, सुरज येडे ,ओमकार मोरे, ईश्वर कानडे , राज्यस्तरीय खेळाडू अनिकेत नागरे, आदनान शेख , अतुल मुळूक,अजिंक्य बांगर यांच्यासह बीड जिल्हा रग्बी असोसिएशनचे सर्व पदाधिकारी, तसेच मोरया क्रीडा मंडळ बीड चे सर्व पदाधिकारी, क्रीडा प्रेमी,खेळाडू यांनी केले आहे.

# परळी शहरातील भीम नगर जगतकर गल्लीतील नागरी सुविधा सोडवण्यात याव्यात-बालासाहेब जगतकर

**परळी/ प्रतिनिधी**

परळी शहरातील भीम नगर जगतकर गल्ली येथील नागरी सुविधा सोडवण्यात याव्यात असे लेखी निवेदन वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा प्रसिद्ध प्रमुख बाळासाहेब जगतकर यांनी परळी नगरपालिकेस दिले असल्याची माहिती ही प्रसिद्धी पत्रकार द्वारे दिली आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की गेल्या दोन महिन्यापासून परळी नगरपालिकेने पाईपलाईन केली असून त्यामुळे जगतकर गल्ली येथे मोठा खड्डा झाला असून येथे लहान मुलांना व महिलांना जाण्याने कठीण झाले असून यामुळे लहान मुले व महिला या खड्ड्यामध्ये पडत आहेत तसेच गेल्या अनेक दिवसापासून नवीन वस्ती झालेली शंकर साळवे ते सखाराम जगतकर कुमार जगतकर यांच्या घरापर्यंत नवीन पाईपलाईन टाकून पाण्याची व्यवस्था करण्यात यावी व याच लाईन वर एक वाल टाकून प्रबुद्ध नगर व नवीन वसाहतीस पाण्याची व्यवस्था करण्यात यावी तसेच भीम नगर येथील स्मशानभूमी त अर्धवट राहिलेले लाईटीचे काम पूर्ण करण्यात यावी या व इतर मागण्याची लेखी निवेदन परळी नगरपरिषद यांना दिले असून ते लवकरात लवकर करण्यात यावेत अन्यथा परळी नगरपालिकेवर वंचित बहुजन आघाडी च्या वतीने भव्य मोर्चा काढण्यात येणार असल्याचेही लेखी निवेदनात म्हटले असल्याची माहिती ही वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा प्रसिद्धीप्रमुख बाळासाहेब जगतकर यांनी दिली आहे

# भद्रकाली परिसरामध्ये कोयता हातात धरून दहशत माजविणाऱ्याला पोलिसांनी केले जेरबंद .



शहर गुन्हे शाखेच्या युनिट एकचे आमदार मुक्तार शेख यांना संशयित असलम खान( 20 रा. फकीरवाडी दरबाज रोड भद्रकाली) हा गुमशा बाबा दर्गा परिसरात हातात कोयता घेऊन दहशत माजवत फिरत असल्याची खबर मिळाली होती. त्यानुसार पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर कड, यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक चेतन श्रीवंत ,सुरेश माळोदे, रमेश कोळी ,शरद सोनवणे ,आप्पा पनवळ, विलास चारोस्कर ,अमोल कोष्टी ,किरण शिरसाठ ,यांच्या पथकाने मोठ्या शिताफीने संशयित असलम यास अटक केली. त्याच्याकडून कोयता जप्त करण्यात आला आहे .याप्रकरणी भद्रकाली पोलिस ठाण्यात पुन्हा दाखल करण्यात आला असून संशयीतास ताब्यात घेण्यात आले आहे.

# कामगार नेते सुरेश पोसतांडेल यांची राज्य प्रदेशाध्यक्षपदी पुन्हा फेरनिवड.

**दैनिक वादळ वार्ता**
**उरण/विठ्ठल ममताबादे**

महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायत कर्मचारी संवर्ग कर्मचारी संघटना (शासन मान्यता प्राप्त) या संघटनेची कार्यकारणीची सर्वसाधारण सभा दिनांक ११ जून २०२४ रोजी मुंबई येथे पार पडली. या बैठकीत सुरेश पोसतांडेल यांची राज्य प्रदेशाध्यक्षपदी पुन्हा फेरनिवड करण्यात आली. उपाध्यक्षपदी गिरीश डुबेवार , सरचिटणीस पदी अनिल पवार ,कोषाध्यक्ष लालू सोनकांबळे ,कार्यकारी अध्यक्ष रामेश्वर वाघमारे,प्रमुख मार्गदर्शक व कोर कमिटी सदस्य दीपक रोडे , विश्वनाथ घुगे, धर्मा खिल्लारे ,संघटक विजय भोंडवे व इतर पदाधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली.या सर्व नियुक्त पदाधिकाऱ्यांवर सर्वच स्तरातून शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.उरण नगर परिषदेचे अधिकारी सुरेश पोसतांडेल हे मनमिळावू, अभ्यासू वृत्तीचे असून प्रशासकीय सेवेचा त्यांना प्रदीर्घ व उत्तम अनुभव आहे. संघटनेच्या माध्यमातून कामगार वर्गांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढला आहे. विविध संघटनेच्या विभागवार बैठकीला त्यांची उपस्थिती असते. विविध कामगारांचे अनेक प्रश्न त्यांनी उत्तमरित्या हाताळले आहे.



आपले काम चोखपणे बजावत, कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडून कामगार वर्गांना नेहमी न्याय दिला. कामगारांसोबत चांगले हीत संबंध जोपासून त्यांना जवळ करण्याचे व त्यांचे प्रश्न सोडविण्याचे चांगले संघटन कौशल्याही सुरेश पोसतांडेल यांच्यात असून त्याची चुणूक त्यांच्या कार्यातून नेहमी दिसते. अशा कामगारांच्या हितासाठी रात्रं दिवस झटणाऱ्या सुरेश पोसतांडेल यांची महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायत कर्मचारी संवर्ग कर्मचारी संघटना (शासन मान्यता प्राप्त )या संघटनेच्या राज्य प्रदेशाध्यक्ष पदी पुन्हा फेरनिवड करण्यात आली आहे.राज्य प्रदेशाध्यक्ष पदी निवड झाल्याने सुरेश पोसतांडेल यांच्यावर सर्वच स्तरातून शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. विविध अधिकारी कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष भेटून तर अनेकांनी व्हाट्सअप, फेसबुक, ट्विटर आदी सोशल मीडियाच्या माध्यमातून सुरेश पोसतांडेल यांना शुभेच्छा देऊन अभिनंदन केले आहे.रायगड जिल्हाध्यक्ष सुनिल जाधव, रायगड जिल्हा कार्याध्यक्ष नितीन कासारे, उरण शाखाध्यक्ष संतोष तेलंगे, शहर सरचिटणीस विजय पवार, शाखा उपाध्यक्ष हर्षद कांबळे, कोषाध्यक्ष संजय पवार, खजिनदार महेश जाधव आदी उरण नगर परिषदेच्या पदाधिकारी कर्मचाऱ्यांनी सुरेश पोसतांडेल यांना पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

# गुंगीचे औषध देऊन लूटमार करणाऱ्या लुटारूस अटक .

रेल्वे स्थानकामध्ये प्रवाश्या सोबत ओळख करून त्यांना गुंगेचे औषध देऊन त्यांची लुटमार करणाऱ्या चोरट्यास रेल्वे सुरक्षा बल व लोहमार्ग पोलिसांनी मोठ्या सीताफिने अटक केली आहे . बुद्धी सागर कुशियाल( वय २० रा. माळेगाव, सिन्नर )हा तरुण सतना ( मध्य प्रदेश ) येथे जाण्यासाठी नाशिकरोड रेल्वे स्थानक येथे तिकीट काढण्यासाठी आला होता.




त्यावेळी छत्रपती संभाजी महाराज नगर येथील मेहबूब चांद शेख ( ४८ )याने त्याच्यासोबत मैत्री करीत चहा घेण्याचा आग्रह केला .चहा घेतल्यानंतर त्याने स्वतः जवळील गुंगीचे औषध टाकून आणलेले क्रीमचे बिस्कीट खाऊ घातले. व प्लॉट क्रमांक एकवर आणून बसवले, थोड्यावेळाने बुद्धीसागर यास गुंगी आल्यानंतर संशयित मेहबूब याने त्याच्याजवळ असलेले १५५० रुपये, पाकीट, आधार कार्ड, पॅन कार्ड ,व मोबाईल असे एकूण १९ हजार ५५० रुपये किमतीचा एवस लुटून पोबारा केला. बुद्धीसागर बेशुद्ध अवस्थेत आढळल्याने त्यास पोलिसांनी बिटको रुग्णालयात दाखल केले .त्याला शुद्ध आल्यावर त्याने अज्ञात व्यक्तीच्या विरोधात लोहमार्ग पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली . त्यानंतर लोहमार्ग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक महेश कुलकर्णी. रेल्वे सुरक्षा बलाचे निरीक्षक हरफुल सिंग यादव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अशोक अहिरे , सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक संतोष उपाडे पाटील, दीपक निकम ,शैलेंद्र पाटील ,रेल्वे सुरक्षा बलाचे दिनेश यादव, मनीष कुमार, निर्मला सूर्यवंशी ,आदींनी गुप्त माहितीच्या आधारे संयुक्त कारवाई करीत चोरी केलेल्या रोख रक्कम व योगासह महबूब शेख यास अटक केली.

# मनोज जरांगेची प्रकृती खालावली ; शरद पवार गेले भेटीला

**दैनिक वादळ वार्ता नाशिक/ सुरेश इंगळे**

मनोज जरांगे पाटील यांनी आठ जून पासून मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी उपोषण सुरू केले .त्यांच्या उपोषणाचा आज चौथा दिवस असून गेले चार दिवसापासून त्यांनी काहीच खाल्ले नसल्यामुळे त्यांची प्रकृती चिंताजनक झाली आहे. डॉक्टरांनी त्यांना उपचाराचा सल्ला दिला, परंतु त्यांनी



उपचार घेण्यास नकार दिला आहे. त्यांच्या उपोषणाच्या पार्श्वभूमीवर आज नाशिक मध्ये सकल मराठा समाज आपली भूमिका स्पष्ट करणार आहे. सकल मराठा समाज ,राज्यातील ज्येष्ठ नेते शरद पवार यांना साकडे घालणार असल्याची माहिती मिळत आहे. शरद पवारांनी जसे महाविकास आघाडीचे नेतृत्व केले, तसेच सर्वपक्षीय आमदार खासदाराचे नेतृत्व करत मराठा समाजाला न्याय देत जरांगे पाटील यांचे आंदोलन थांबविण्यासाठी मागणी करण्याची शक्यता आहे. आता सकल मराठा समाज नेमकी काय भूमिका मांडणार ? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# मिटकरींचा दावा सोनवणेंनी धुडकावला; म्हणाले मी मरेपर्यंत शरद पवारांसोबत अजित पवारांना फोन केल्याचे मिटकरींचे होते टविट

**प्रतिनिधी/अंबाजोगाई**

बीड: बीडच्या बप्पाचा दादांना फोन असे टविट् अजित पवार गटाचे आ.अमोल मिटकरी यांनी केले होते. यानंतर खा.बजरंग सोनवणे यांनी हा दावा धुडकावत लावत आपण मरेपर्यंत शरद पवार यांच्यासोबत राहू, असे स्पष्ट शब्दात सांगून टाकले. अजित पवार गटाचे आमदार अमोल मिटकरी यांच्या दाव्याने राजकीय वर्तुळात बीडचे राष्ट्रवादी शरद पवार गटाचे खासदार बजरंग सोनवणे अजित पवारांच्या संपर्कात आहेत का, अशी चर्चा सध्या राजकीय वर्तुळात रंगली आहे. 'बीडच्या बप्पाचा दादांना फोन' अशा आशयाचं ट्वीट आमदार अमोल मिटकरी यांनी केलं आहे. त्यामुळे शिवसेनेप्रमाणे राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीतही खासदार फुटीची भीती आहे का, असा सवाल उपस्थित केला जात आहे. मात्र, या प्रकरणावर बजरंग सोनवणे यांनी स्पष्टीकरण देत, मी मरेपर्यंत शरद पवार साहेबांसोबतच राहणार, असं स्पष्ट केलं आहे.अमोल मिटकरी यांनी ट्वीट केल्यानंतर बीडचे नवनिर्वाचित खासदार बजरंग सोनवणे माध्यमांशी बोलताना म्हणाले, अमोल मिटकरी यांनी लोकसभेमध्ये किमान एखादा खासदार निवडून आणायला हवा होता. त्यानंतर त्यांनी दुसऱ्याच्या



बाबतीत बोलावं की, बजरंग सोनवणे शरद पवार साहेबांना सोडून अजित पवार साहेबांच्या गटात येणार किंवा त्यांच्या संपर्कात राहून त्यांच्यात येणार, हे जे काही मिटकरींनी ट्वीट केलं आहे. मी आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत आदरणीय शरदचंद्र पवार साहेबांसोबतच असणार आहे. असे संभ्रम निर्माण करण्याचे प्रकार अमोल मिटकरी यांनी बंद करावेत, त्यांनी आधी एखादा ग्रामपंचायतचा सदस्य निवडून आणावा, असा टोलाही लगावला. काय म्हणाले सोनवणे... 'मी फोन करण्याचा संबंध कुठे येतो. ते असा संभ्रम का पसरवत आहेत, हे त्यांनाच विचारायला हवं. ते महाराष्ट्रातील जनतेला कनफ्युज का करत आहे. या राजकारणाच्या प्रक्रियेमध्ये वैयक्तिक विचार असतात, ते तुम्ही राजकारणात आणताय. हे मिटकरी अतिशय चुकीचं करत आहेत. मिटकरींना माझी विनंती आहे की, ते आमदार झालेत ते डायरेक्टली झालेत. आता त्यांना पक्षाने काय पद दिलंय, मला माहित नाही, त्यांनी एकदा जनतेतून निवडून यावं आणि त्यानंतर दुसऱ्यांच्या उष्टीला हात घालावा, ही माझी विनंती आहे. मी जिवंत असेपर्यंत मी शरद पवार साहेबांसोबतच राहणार', असं म्हणत बजरंग सोनवणे यांनी राजकीय वर्तुळातील चर्चांना पूर्णविराम दिला आहे.

# गुंगीचे औषध देऊन लूटमार करणाऱ्या लुटारूस अटक .

**दैनिक वादळ वार्ता**
**नाशिक/सुरेश इंगळे**




रेल्वे स्थानकामध्ये प्रवाश्या सोबत ओळख करून त्यांना गुंगेचे औषध देऊन त्यांची लुटमार करणाऱ्या चोरट्यास रेल्वे सुरक्षा बल व लोहमार्ग पोलिसांनी मोठ्या सीताफिने अटक केली आहे . बुद्धी सागर कुशियाल( वय २० रा. माळेगाव, सिन्नर )हा तरुण सतना ( मध्य प्रदेश ) येथे जाण्यासाठी नाशिकरोड रेल्वे स्थानक येथे तिकीट काढण्यासाठी आला होता. त्यावेळी छत्रपती संभाजी महाराज नगर येथील मेहबूब चांद शेख ( ४८ )याने त्याच्यासोबत मैत्री करीत चहा घेण्याचा आग्रह केला .चहा घेतल्यानंतर त्याने स्वतः जवळील गुंगीचे औषध टाकून आणलेले क्रीमचे बिस्कीट खाऊ घातले. व प्लॉट क्रमांक एकवर आणून बसवले, थोड्यावेळाने बुद्धीसागर यास गुंगी आल्यानंतर संशयित मेहबूब याने त्याच्याजवळ असलेले १५५० रुपये, पाकीट, आधार कार्ड, पॅन कार्ड ,व मोबाईल असे एकूण १९ हजार ५५० रुपये किमतीचा एवस लुटून पोबारा केला. बुद्धीसागर बेशुद्ध अवस्थेत आढळल्याने त्यास पोलिसांनी बिटको रुग्णालयात दाखल केले .त्याला शुद्ध आल्यावर त्याने अज्ञात व्यक्तीच्या विरोधात लोहमार्ग पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली . त्यानंतर लोहमार्ग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक महेश कुलकर्णी. रेल्वे सुरक्षा बलाचे निरीक्षक हरफुल सिंग यादव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अशोक अहिरे , सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक संतोष उपाडे पाटील, दीपक निकम ,शैलेंद्र पाटील ,रेल्वे सुरक्षा बलाचे दिनेश यादव, मनीष कुमार, निर्मला सूर्यवंशी ,आदींनी गुप्त माहितीच्या आधारे संयुक्त कारवाई करीत चोरी केलेल्या रोख रक्कम व योगासह महबूब शेख यास अटक केली.

# भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या वतीने पुनंदगाव येथे वृक्षारोपणाचे आयोजन

माजलगाव तालुक्यातील पुनंदगाव याठिकाणी भ्रष्टाचार निर्मुलन समितीच्या वतीने वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात येणार आहे 20 जून 2024 रोजी वृक्षारोपण करण्यात येणार आहे असे भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे जिल्हाध्यक्ष परमेश्वर सोळंके यांनी पत्रकात म्हटले आहे भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या 26 वर्धापन दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन बीड जिल्ह्यात ठेवण्यात आलेले आहे तर माजलगाव मध्ये पुनंदगाव या ठिकाणी वृक्षारोपण करण्याचे ठरवले आहे असे पत्र काढण्यात आलेले आहे यावेळी तेथील उपसरपंच ग्रामसेवक आणि समितीचे तालुका अध्यक्ष सिद्धेश्वर गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थित वृक्षारोपण करण्याचे आयोजन केलेले आहे . भ्रष्टाचार निर्मुलन समितीच्या 26 व्या वर्धापन दिनानिमित्त समितीच्या वतीने वृक्षारोपण तालुक्यातील पुनंदगाव याठिकाणी आयोजित करण्यात आला आहे. येथील उपसरपंच यांनी मोठा पुढाकार घेऊन आमच्या गावामध्ये सामाजिक कार्यक्रम राबवण्यात येतात व ते राबवली गेली पाहिजे असे म्हटले आहे गाव हे धरण परिसर असल्यामुळे या परिसरात मोठ्या प्रमाणात वृक्षाची लागवड होण्यासाठी ग्रामपंचायत सदैव सामाजिक संघटनेच्या पाठीमागे राहील असे मत व्यक्त केले आहे

# सरकारने शब्द देऊनही परशुराम आर्थिक विकास महामंडळ झाले नाही १५ ऑगष्ट पासून पुन्हा उपोषण करावे लागणार-धनंजय कुलकर्णी

**वादळवार्ता/केज**

समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समिती मागील अनेक वर्षापासून परशुराम आर्थिक विकास महामंडळासाठी आंदोलन करत आहे १४ डिसेंबर २०२३ रोजी नागपूर येथील अधिवेशनात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांनी घोषणा करूनही मागील सहा महिन्यात साध परशुराम आर्थिक विकास महामंडळ करु न शकणाऱ्या सरकारला ब्राह्मण समाजासाठी काही देण्याची इच्छा नाही असे दिसते त्यामुळे १५ आ?गष्ट च्या आत जर परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन होऊन त्यासाठी ५०० कोटीचा निधी देऊन कार्यरत झाले नाही तर समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समिती पुन्हा आमरण उपोषण करेल व यावेळी महामंडळ कार्यरत झाल्याशिवाय उपोषण मागे घेतले जाणार नाही. समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समिती ब्राह्मण समाजाच्या मागण्यासाठी अनेक वर्षापासून रस्त्यावर उतरून आंदोलन करत आहे यामधे १ सप्टेंबर २०१८ चे केज तहसीलसमोर धरणे , २८ आक्टोबर २०१८ रोजी केज ते बीड मोटार सायकल मोर्चा , २२ जानेवारी २०१९ चे आझाद मैदानावर धरणे आंदोलन यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आश्वासन देऊन देखील काही केले नाही , त्यानंतर ३ आ?गष्ट २०१९ ला औरंगाबाद येथे आयुक्त कार्यालयासमोर धरणे



आंदोलन , त्यानंतर २२ जानेवारी २०२० रोजी बीड कलेक्टर आ?फीस समोर धरणे आंदोलन , त्यानंतर केज , बीड जिल्हा व मराठवाडा मधे अनेक ठिकाणी पळी ताम्हण वाजवून आंदोलन त्यानंतर सातत्याने अनेक ठिकाणी आंदोलन झाली , अंबाजोगाई येथील बैठकीत आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला व २८ नोव्हेंबर २०२३ रोजी जालना चमन येथे आमरण उपोषण केले इतर मागास विभागाचे मंत्री अतुलजी सावे यांनी दिलेल्या लेखी आश्वासनाने उपोषण मागे घेतले व दि १४ डिसेंबर २०२३ रोजी नागपूर येथील अधिवेशनात समस्त ब्राम्हण समाज संघर्ष समितीच्या शिष्टमंडळा सोबत मुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे , उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस , मंत्री अतुलजी सावे , छगनरावजी भुजबळ ,संदिपान भुमरे , संजय राठोड यांच्या सह सर्व विभागाचे सचीव यांच्या उपस्थिती मधे मुख्यमंत्री महोदयानी परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापनेची घोषणा केली त्यानंतर १ फेब्रुवारी रोजी इतिवृत्त तयार झाले यामधे ब्राह्मण समाजातील आर्थिकदृष्ट्या मागास तरुण असा उल्लेख करून इतिवृत्त तयार वास्तविक पाहता ब्राह्मण समाजातील गरजू ना लाभ मिळायला हवा परंतु तरुण आर्थिकदृष्ट्या मागास या शब्दाचा वापर करून शब्दछल करत इतिवृत्त बनवले यावर संघर्ष समितीने हे दुरुस्त करून लवकर प्रस्ताव तयार करावा अशी मागणी केली परंतु त्यानंतर सरकारने संघर्ष समितीच्या व ब्राह्मण समाजाच्या मागणी अजिबात लक्ष दिले नाही अजूनही परशुराम आर्थिक विकास महामंडळ तयार झाले नाही याचा अर्थ ब्राह्मण समाजाच्या मागणी कडे दुर्लक्ष करण्याची मानसिकता दिसत आहे तरी १५ आ?गष्ट पर्यत परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन करून ५०० कोटी चा निधी तात्काळ देऊन महामंडळ कार्यान्वित करावे अन्यथा समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समिती १५ आगष्ट पासून आमरण उपोषण करेल असे संघर्ष समितीचे मुख्य समन्वयक धनंजय कुलकर्णी केज , दिपक रणनवरे जालना , श्रीकांत जोशी अकोला , ईश्वर दिक्षीत मलकापुर बुलढाणा , विजयाताई कुलकर्णी छत्रपती संभाजी नगर , ॲड राजेंद्र पोतदार वसमत , स्वप्नील केळकर डोंबिवली , अशोक वाघ जळगाव , उदय जोशी नंदुरबार , ॲड भानुदास शौचे नाशिक , शाम कुलकर्णी गंगाखेड , संतोष कुलकर्णी नांदेड , योगेश जानतीकर लातुर , ॲड प्रज्ञा भिडे दादर मुंबई , अतुल घोडके , विजय दिवाण बार्शी , अनिल दिक्षीत धुळे , भीमाशंकर कुलकर्णी औसा महेश अकोलकर अंबाजोगाई , मकरंद कुलकर्णी अंबाजोगाई , विनायक रत्नपारखी माजलगाव , दत्ता महाजन माजलगाव , दिगंबर जोशी वडवणी , योगेश जोशी चिंचाळा , डॉ राजेंद्र चौधरी पाथरी , प्रवीण जोशी पाथरी , विजय देशपांडे नगर , गणेश लंके पंढरपूर , विजय जोशी पाटोदा , व्यंकटेश जोशी धाराशीव , अविनाश कुलकर्णी आकुर्डी पुणे , दिपाली देशपांडे पुणे , विकास वाघ धाराशीव , किशोर कुलकर्णी साक्री , किशोर कुलकर्णी मोहोळ सोलापूर , जयंत देव वाशीम , लिना दापोलीकर रत्नागिरी यांनी सांगितले याबाबतीत केज तहसील कार्यालयात ना. त. आशा वाघ यांना निवेदन देण्यात आले यावेळी धनंजय कुलकर्णी , श्रीनिवास केजकर , श्रीधर खोत , व्यंकटेश महाजन उपस्थित होते

# सोयगाव तालुक्यात मुसळधार पाऊस ;निंबायंतीला पुरात ट्रॅक्टर वाहून गेले

वादळवार्ता/सोयगाव

सोयगाव सह तालुक्यात सोमवारी रात्री ते मंगळवारी पहाटे चार वाजेपर्यंत मुसळधार पावसाने हजेरी लावली यामध्ये जरंडी मंडळात सर्वाधिक ६० ,मी मी तर सावळदबारा मंडळात नीचांकी १० मी मी पावसाची नोंद झाली असून मंगळवारी पहाटे निंबायती गावातील नाल्याला आलेल्या पुरात नाल्याजवळ उभे असलेले ट्रक्टर पुराच्या पाण्यात वाहून गेल्या ची घटना पहाटे चार वाजता घडली दरम्यान सोयगाव तालुक्यातील सोयगाव, बनोटी, जरंडी या तीन



मंडळात मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे त्यामुळे परिसरात सर्वच नद्या नाले दुथडी भरून वाहू लागले आहे

सोयगाव तालुक्यात सोमवारी रात्री अकरा वाजेपासून पावसाला सुरुवात झाली रात्री उशीरा पावसाचा जोर वाढला होता त्यामुळे जरंडी, निंबायती, घोसला, बहुलखेडा, कवली या भागात रात्री तीन ते चार वाजेच्या दरम्यान पूरग्रस्त स्थिती निर्माण झाली होती निंबायती गावा नजीक असलेल्या नाल्याला रात्री पूर आला यामध्ये ट्रॅक्टर वाहून गेल्या ची घटना उघडकीस आली दरम्यान सर्वत्र पूरग्रस्त स्थिती झाली होती सोयगाव तालुक्यातील तीन मंडळात पाऊस झाल्याने खरिपाच्या पेरण्यांच्या कामांनी वेग घेतला आहे.. चौकट---सोयगाव तालुक्यात सोमवारी रात्री ते मंगळवारी पहाटे पर्यंत झालेल्या पावसाने तालुक्यातील जरंडी च्या धिंगापूर धरणांची पाणी पातळी सह ते सात फुटांनी वाढली आहे त्यामुळे मृत साठ्यावर आलेल्या या धरणात आता पाणी साठा आला आहे मात्र इतर दहा धरणाच्या पाणी पातळीत कोणतीही वाढ झाली नसल्याचे पाट बंधारे विभागाने सांगितले....

## ज्ञानराधाची माजलगाव शाखा केली सील !

माजलगाव ( लोकरंजन): ज्ञानराधा मल्टीस्टेट पतसंस्थेच्या गैरव्यवहारात दाखल झालेल्या माजलगाव येथील प्रकरणांमध्ये गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडून केला जात आहे. ज्ञानराधा सुरेश कुटे आणि आशिष पतसंस्था कटे ग्रुप वरील प्राप्तिकर सुरू आहे. दरम्यान आर्थिक गुन्हे शाखेने सोमवारी माजलगाव येथील ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या मोंढा शाखेला दोन सरकारी पंचांच्या उपस्थितीत सील केले आहे. बीड शहरातील ज्ञानराधा . नऊ महिन्यापासून ठेवीदारांना त्यांच्या ठेवी परत मिळत नाहीत. यामुळे ज्ञानराधा विरोधात जिल्ह्यात १४ गुन्हे दाखल झाले आहेत. पोलिसांनी पतसंस्थेचे अध्यक्ष सुरेश कुटे आणि संचालक आशिष पाटोदकर यांना पुण्यातून अटक केलेली आहे. त्यांना १३ जून पर्यंत न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावलेली आहे. आर्थिक गुन्हे शाखा याप्रकरणी तपास करत आहे. सुरेश कुटे आणि आशिष पाटोदकर यांचे जबाब नोंदवले गेले आहेत तर सोमवारी पोलीस उपनिरीक्षक भारत बर्डे यांच्या पथकाने माजलगावातील मोंढा भागात असलेली ज्ञानराधा पतसंस्थेची शाखा सील केली आहे. या शाखेतील कागदपत्रे, संगणक, सॉफ्टवेअर सुरक्षित रहावे. यासाठी ही शाखा सील करण्यात आली आहे.

# आर्य वैश्य आर्थिक विकास महामंडळ संघर्ष समिती, महाराष्ट्रची बीड जिल्हा कार्यकारिणी जाहीर

**वादळवार्ता/परळी**

आर्य वैश्य समाजातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकाच्या उन्नतीसाठी, कल्याणासाठी राज्य शासनाने 'आर्य वैश्य आर्थिक विकास महामंडळ' स्थापन करावे यासाठी 'आर्य वैश्य आर्थिक विकास महामंडळ संघर्ष समिती, महाराष्ट्र' च्या वतीने शासन दरबारी प्रयत्न सुरू आहेत. शासनाने आपली ही मागणी मान्य करून आपल्या समाजाला न्याय द्यावा म्हणून संघर्ष समिती च्या वतीने मागील दहा वर्षांपासून आंदोलने करण्यात येत आहेत. मागील दहा वर्षांपासून शासनाकडे सतत मागणी करून ही, राज्यभरात आंदोलने करून ही शासन आपल्या मागणीची दखल घेत नसल्यामुळे 'आर्य वैश्य आर्थिक विकास महामंडळ संघर्ष समिती, महाराष्ट्र' च्या वतीने ०५ मार्च २०२४ रोजी मंत्रालय, मुंबई इथे सामूहिक आत्मदहन आंदोलन ही पुकारण्यात आले होते. त्यादृष्टीने संघर्ष समिती चे प्रदेशाध्यक्ष नंदकुमार लाभसेटवार यांच्या नेतृत्वाखाली संघर्ष सामिती चे सचिव ब्रह्मानंद सुधाकर चक्करवार, समितीचे प्रदेश उपाध्यक्ष राजकुमार मूत्तेपवार, संतोष उत्तरवार, गोविंद केशवशेट्टी, बालाजी पांपटवार, सीताराम देबडवार, मयूर मामीडवार, अनिल डूब्बेवार, संतोष फुटाने आदी पदाधिकारी मंत्रालयाकडे निघाले असतांनाच मुंबई पोलीस आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली नेमण्यात आलेल्या मुंबई पोलिस अधिकाऱ्याच्या विशेष पथकाने त्यांना बोलार्ड इस्टेट, मुंबई येथून ताब्यात घेतले. त्यामुळे पुढील अनर्थ टळून या विषयावर मंत्रालयात संबंधीत अधिकाऱ्याकडे बैठक झाली. दरम्यान संघर्ष समितीचे सचिव ब्रह्मानंद चक्करवार यांना मुख्यमंत्री कार्यालयाकडून



या विषयावरील बैठकीसाठी बोलावण्यात आले. तसेच आर्य वैश्य समाजाचे नेते तथा वन व सांस्कृतीक कार्य मंत्री सुधीर मूनगंटीवार यांनीही 'आर्य वैश्य आर्थिक विकास महामंडळ संघर्ष समिती, महाराष्ट्र' च्या या मागणीची, आंदोलनाची दखल घेवून हा विषय लवकरच मार्गी लावण्याचा शब्द संघर्ष समिती चे प्रदेशाध्यक्ष नंदकूमार लाभसेटवार यांना दिला. या पार्श्वभूमीवर राज्यशासनाने लवकरात-लवकर 'आर्य वैश्य आर्थिक विकास महामंडळ' स्थापन करावे या दृष्टीने संघर्ष समितीच्या वतीने व्यूहरचना आखण्यात येत आहे. याचाच भाग म्हणून आर्य वैश्य आर्थिक विकास महामंडळ चळवळीची व्यापकता वाढविण्यासाठी संघर्ष समितीचे प्रदेशाध्यक्ष नंदकूमार लाभसेटवार, सचिव ब्रह्मानंद चक्करवार विविध जिल्ह्यात जिल्हा कार्यकारिणीचे गठन करत आहेत. याच दृष्टीने दि. ०९, रविवार रोजी 'आर्य वैश्य आर्थिक विकास महामंडळ संघर्ष समिती, महाराष्ट्र' च्या बीड जिल्हा कार्यकारिणीचे गठन करण्यात आले. यासाठी जिल्हाध्यक्ष राजेश कौलवार यांच्या अध्यक्षतेखाली दि. ०९ जून, रविवार रोजी रोजी दू. ०४ वाजता आर्य वैश्य समाजबांधव, बीड यांची बैठक पार पडली. या बैठकीत आर्य वैश्य समाजातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकाच्या कल्याणासाठी 'आर्य वैश्य आर्थिक विकास महामंडळ' स्थापन होणे किती गरजेचे आहे, महत्वाचे आहे हे समाजबांधवांना समजावून सांगण्यात आले. त्यानंतर या विषयावर सांगोपांग चर्चा होऊन पुढील वाटचालीच्या दृष्टीने 'आर्य वैश्य आर्थिक विकास महामंडळ संघर्ष समिती, महाराष्ट्र' ची बीड जिल्हा कार्यकारिणी सर्वानुमते ठरविण्यात आली. घोषित करण्यात आली. ती पुढील प्रमाणे आहे. जिल्हा अध्यक्ष : राजेश कोलवार, जिल्हा मार्गदर्शक : नागनाथ पारसेवार, रमाकांत कौलवार, जिल्हा सचिव : रमेश कोमावार जिल्हा उपाध्यक्ष : विवेक पारसेवार, गोविंद पेटेवार, जिल्हा संपर्क प्रमुख : शुभम बसेट, जिल्हा सदस्य : नंदकिशोर डुबे, अनिल रुद्रवार, राघवेंद्र गडगुळ, अनिल बोतकुलवार, स्वप्निल गडम.

# पहिल्याच पावसात जायकवाडी धरणा ची पाणी पातळी वाढली

**दैनिक वादळ वार्ता छ.संभाजीनगर/चैताली औटे**

जायकवाडी धरण परिसरात रविवारी झालेल्या जोरदार पावसाने अर्धा टक्के पाणीसाठा वाढला. ४८३७ क्युसेक आवक दाखल झाल्याने धरणाचा पाणीसाठा रविवारी ३.९०% होता तो सोमवारी ४.५० टक्क्यांवर पोहोचला. धरण क्षेत्रात रविवारी झालेला ६२ मिमी पावसाने जायकवाडी धरणात अर्धा टक्क्यांनी पाणी वाढले आहे. हे पाणी छत्रपती संभाजी नगर व जालना जिल्ह्याला पिण्यासाठी एक महिनाभर पुरेल एवढ्या साठ्याची वाढ झाल्याचे अभियंता विजय काकडे यांनी सांगितले. यामुळे शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण आहे. जायकवाडी धरणाची पाणी पातळी मागील वर्षी केवळ ४७% वर राहिली, तर



या उन्हाळ्यात हा साठा ३.५० टक्क्यांवर आल्याने मराठवाड्यावर जलसंकट निर्माण झाले होते . रविवारी धरण क्षेत्रात जोरदार पाऊस जोरदार पाऊस झाल्याने जूनच्या पहिल्या व एक दिवसात ६२ मिमी पावसाने अर्धा टक्का वाढला आहे .धरण क्षेत्रात झालेल्या पावसाने हा टक्का वाढला आहे .वरील भागात पावसाने जोर वाढला तर जायकवाडी यंदा भरू शकते. पातळीत घट झाल्याने छत्रपती संभाजी नगर वर आपत्कालीन पंपाने पाणीपुरवठा करण्याची तयारी प्रशासन करत असताना आवक सुरू झाल्याने मोठा दिलासा मिळाला आहे.

## भद्रकाली परिसरामध्ये कोयता हातात धरून दहशत माजविणाऱ्याला पोलिसांनी केले जेरबंद .



शहर गुन्हे शाखेच्या युनिट एकचे आमदार मुक्तार शेख यांना संशयित असलम खान( 20 रा. फकीरवाडी दरबाज रोड भद्रकाली) हा गुमशा बाबा दर्गा परिसरात हातात कोयता घेऊन दहशत माजवत फिरत असल्याची खबर मिळाली होती. त्यानुसार पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर कड, यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक चेतन श्रीवंत ,सुरेश माळोदे, रमेश कोळी ,शरद सोनवणे ,आप्पा पनवळ, विलास चारोस्कर ,अमोल कोष्टी ,किरण शिरसाठ ,यांच्या पथकाने मोठ्या शिताफीने संशयित असलम यास अटक केली. त्याच्याकडून कोयता जप्त करण्यात आला आहे .याप्रकरणी भद्रकाली पोलिस ठाण्यात पुन्हा दाखल करण्यात आला असून संशयीतास ताब्यात घेण्यात आले आहे.

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मद्रकग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथनू डिजिटल छापनू संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथनू त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )